# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## ऑरेंज लाईन विस्ताराचा शुभारंभ – नागपूर मेट्रोने पहिल्या स्पॅनचं यशस्वीरित्या केले लाँचिंग

### रीच-2B चे काम २४ महिन्यांत पूर्ण होणार




नागपूर: महा मेट्रोने, नागपूर मेट्रोच्या टप्पा-II विस्तारात महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, रीच-2B मध्ये पहिल्या स्पॅनचं यशस्वीरित्या लाँचिंग करण्यात आले आहे. रीच 2B ची एकूण लांबी 6.016 किमी असून, लेखा नगर (आशा हॉस्पिटल) ते कन्हान नदी मेट्रो स्टेशन पर्यंत हा विस्तार आहे. या प्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर, संचालक (प्रकल्प) श्री. राजीव त्यागी, कार्यकारी संचालक श्री. अरुण कुमार, मुख्य प्रकल्प व्यवस्थापक (रीच 2) श्री. विद्यसागर तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

हा महत्त्वाचा कॉरिडॉर नागपूर शहराच्या उत्तरेकडील भागात लास्ट माईल कनेक्टिव्हीटी सुधारण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून यामुळे कँटोन्मेंट, शाळा, हॉस्पिटल्स, बस स्थानके इत्यादी शहरी भागांशी सहज जोडल्या जाऊ शकणार आहे. ऑरेंज लाईनचा हा विस्तार एकूण १२.० किमी लांबीच्या मार्गाचा भाग असून, ऑटोमोटिव चौक ते साई मंदिर (कन्हान नदी) दरम्यान ही कनेक्टिव्हिटी प्रदान करणार आहे.

रीच 2 दोन भागांत विभागलेले आहे – 2A आणि 2B.

1) रीच 2A मध्ये पिली नदी, खसरा फाटा, ऑल इंडिया रेडिओ, खैरी फाटा, लोक विहार आणि लेखा नगर

2) रीच 2B मध्ये कँटोन्मेंट, कामठी पोलीस स्टेशन, कामठी नगर परिषद, ड्रॅगन पॅलेस, गोल्फ क्लब आणि कन्हान नदी मेट्रो स्टेशनचा समावेश आहे

प्रथम २५ मीटर लांबीच्या स्पॅनमध्ये ९ सेगमेंट्स आहेत आणि या सेगमेंट्सचं उभारणी ‘सह्याद्री’ नावाच्या लॉन्चिंग गर्डरच्या सहाय्याने करण्यात आले. या पहिल्या स्पॅनची लाँचिंग हे फ़ेज -II च्या वेळेवर व यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचं पाऊल ठरणार.